प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd /cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०७.०४.२०२२**

**नवी मुंबईतील पाणी पुरवठ्या संदर्भात सिडकोतर्फे महत्वाची पाऊले**
**अवैध नळजोडणीवर सिडकोची नजर**

नवी मुंबईतील पाण्याची समस्या लक्षात घेता सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळातर्फे नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) यांच्याशी एकत्रितपणे चर्चा करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी नियोजन करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी सिडकोतर्फे खारघर, कळंबोली, पनवेल, करंजाडे आणि तळोजा नोडमधील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपरोक्त प्राधिकरणांसोबत चर्चा करण्यात आली होती. नवी मुंबई महापालिकेतर्फे पूर्वनिश्चित नियोजनानुसार ५० एमएलडी पाण्याचा पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात करण्यात येणारा ४३ एमएलडी पाण्याचा पुरवठा करण्यात येत होता. परंतु काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आल्यानुसार एनएमएमसीतर्फे ५० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरळीतपणे करण्यात येत असल्याने खारघरमधील बहुतांशी परिसरातील पाणी पुरवठा संतुलित झाला आहे.

त्याचबरोबर लघुकालीन उपाययोजनांमध्ये खारघरमधील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी सेक्टर-18, येथे बसविण्यात आलेला २० लाख लीटरचा जलकुंभ (ईएसआर) येत्या 8 दिवसांत कार्यान्वित होणार आहे. उलवे येथील सेक्टर-16 व 17 मधील जलवाहिन्यांचे काम येत्या 8 दिवसांत पूर्ण होणार आहे. त्याचबरोबर तळोजा नोड येथे उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या भूमिगत जलकुंभाबाबतचा (जीएसआर) अहवाल येत्या 2 दिवसांत तयार होणार आहे. तळोजा नोडला अधिक वॉटर टँकरचा पुरवठा करण्यात येणार असून हेटवणे पाणी पुरवठा योजनेतील पाण्याच्या दाबावर देखरेख ठेवण्यात येणार आहे. खारघरनजीकच्या गावांचे सर्वेक्षण करून तेथील पाणी पुरवठ्याच्या परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. तसेच उपरोक्त नोडमधील पाणी चोरी व पाण्याचा अपव्यय या घटना टाळण्यासाठी अधिकाऱ्यांतर्फे रात्रीच्या वेळी अचानक भेटी देण्यात येणार आहे.

**“पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबरोबरच या उपाययोजनांचा नियमितपणे आढावाही सिडकोकडून घेण्यात येत आहे. तसेच अवैध नळ जोडणी रोखण्यासाठी मोहिम सुरू करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.”**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

दर रविवारी टाटा पॉवर कंपनीकडून जल विद्युत निर्मिती बंद होत असल्यामुळे मजिप्राच्या पाताळगंगा जल केंद्रातून उपसा करणे  अशक्य होत असल्याने कळंबोली, पनवेल, करंजाडे परिसरातील पाणी पुरवठ्यावर परिणाम होत आहे. याकरिता टाटा पॉवर कंपनीला दर रविवारी जरी जल विद्युत निर्मिती बंद ठेवली तरी पाणी नेहमीसारखे पाताळगगा नदीत सोडण्याची विनंती करणारे पत्र पाठवण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे करण्यात येत असलेल्या लघुकालीन व दिर्घकालीन उपाययोजना, सर्व संबंधित प्राधिकरणांचे सहकार्य व अवैध नळ जोडणीविरोधातील मोहिम यांमुळे पाणी पुरवठ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मदत होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**